MHWS090001452026

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ सपना गोविंद चरखा ही मयत नामे श्रीकिसन बिहारीलाल राठी यांची मुलगी असुन अर्जदार क्र.२ हा नातु व अर्जदार क्र.३ ही सुन आहे. श्रीकिसन बिहारीलाल राठी यांचा मृत्यू दिनांक १५.०१.२०२६ रोजी त्यांचे राहते घरी मानोरा, ता. मानोरा जि.वाशिम येथे झाले. मयत श्रीकिसन यांची पत्नी नामे ललिता श्रीकिसन राठी ह्या दि.२१.०१.२०१६ रोजी व व मुलगा नामे अनिल श्रीकिसन राठी हा दि.१३/०७/२००१ रोजी मयत झाले आहे. मयत श्रीकिसन यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयत श्रीकिसन यांचे कायदेशीर वारस असुन तसे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस दिनांक १७.०४.२०२६ रोजीचे दैनिक 'सायरन' या वृत्तपत्रामध्ये देण्यात आली. त्याची प्रत निशाणी क.१३ वर दाखल केली आहे. जाहीर सुचनापत्र अहवालाची प्रत निशाणी क्र.६ वर दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या मागणीच्या पृष्ट्यर्थ पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.९ वर दाखल करुन अर्जातील इतर कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदाराने नगरपंचायत, मानोरा यांच्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या मयत श्रीकिसन व ललिता व अनिल यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळप्रत अनुक्रमे निशाणी क्र.१०, ११ व १७ वर, नगरसेवक नगरपंचायत मानोरा, ता. मानोरा जि.वाशिम यांच्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या मयत श्रीकिसन यांच्या वारस प्रमाणपत्राची

मुळप्रत निशाणी क्र.१२ वर, तर अर्जदारांतर्फे अधिकचा पुरावा देणे नाही बाबतची पुरसिस निशाणी क्र.१४ वर दाखल आहे.

४. मृत्यू दाखला पाहता मयत नामे श्रीकिसन बिहारीलाल राठी यांचा मृत्यू दिनांक १५.०१.२०२६ रोजी झाल्याचे दिसते. अर्जदारांतर्फे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व दाखल कागदपत्रावरुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याचे शाबीत होते. त्यामुळे अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत नामे श्रीकिसन बिहारीलाल राठी यांचे पश्चात अर्जदार क्र.१ **सौ. सपना गोविंद चरखा**, अर्जदार क्र.२ **डॉ. गोपाल अनिल राठी** अर्जदार क्र.३ **किरण अनिल राठी** हे वारस असल्याबाबतचा वारस दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ चे परिशिष्ट–ब प्रमाणे आवश्यक मुद्रांक दिल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ३ यांना देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.06.16 16:22:35 +0530

मानोरा
दिनांक : १६.०६.२०२६

( ज. तु. कोरेगांवकर )
दिवाणी न्यायाधिश ( क. स्तर), मानोरा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. R. K. Chavhan , (Grade-III) |
| Court Name | :- | (Shri. J. T. Koregaonkar)<br>Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora.<br>Dist. Washim. |
| Date | :- | 16/06/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 16/06/2026 |
| Order uploaded on | :- | 16/06/2026 |